# जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

प्रशासकीय इमारत, स.नं. ४८८, जालना

## (जिल्हा नियंत्रणक कक्ष)/(आपत्ती व्यवस्थापन)

दुरध्वनी क्रमांक (०२४८२)-२२३१३२ टोल फ्री क्रमांक १०७७ फॅक्स क्रमांक (०२४८२)-२२६४७७,२२५३२६

E-mail. rdcjalna@gmail.com, jalnaddmo@gmail.com Website: - www.jalna.gov.in, http://59.90.142.57/ddmajalna


जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि- दिनांक २९/०४/२०२०

**(ई-मेलने/टपालाने)** आपत्ती प्राधान्य

वाचा :-

१) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.

२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.

३) फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४.

४) या कार्यालयाचे समक्रमांकीत मुदतवाढ आदेश दिनांक १५/०४/२०२०.

५) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय,मुंबई-३२ यांचे आदेश क्र.डिएमयु/२०२०/सिआर-९२/DisM-१/दिनांक १७/०४/२०२०.

६) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय,मुंबई-३२ यांचे एकत्रीत सुधारीत मार्गदर्शक तत्वे क्र.डिएमयु/२०२०/सिआर-९२/DisM-१/दिनांक १७/०४/२०२०.

७) या कार्यालयाचे समक्रमांकीत आदेश दिनांक १८/०४/२०२०.

८) या कार्यालयाचे समक्रमांकीत फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ (१)(३) अन्वयेचे मनाई आदेश दिनांक २०/०४/२०२०.

९) या कार्यालयाचे समक्रमांकीत आदेश दिनांक २०/०४/२०२० व दिनांक २३/०४/२०२०.

१०) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय,मुंबई-३२ यांचे सुधारीत एकत्रीत सुधारीत मार्गदर्शक तत्वे क्र.डिएमयु/२०२०/सिआर-९२/DisM-१/दिनांक २८/०४/२०२०.

**विषयः** **(कोविड-१९) कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना करणे बाबत.**

## आदेश

ज्याअर्थी, राज्य शासनाकडून संदर्भ क्रं.६ वरील आदेशा अन्वये त्यांचे उक्त संदर्भात नमुद दिनांक २५/०३/२०२० व दिनांक १५/०४/२०२० ची अधिसुचना अधिक्रमीत करुन दिनांक २०/०४/२०२० ते दिनांक ०३/०५/२०२० रोजीच्या मध्यरात्रीपर्यंत लॉकडाऊन अंमलात असणारे आदेश निर्गमित केले आहेत.

आणि ज्याअर्थी, या कार्यालयाचे समक्रमांकीत आदेश दिनांक २५/०३/२०२० अन्वये संपूर्ण जालना जिल्ह्यातील क्षेत्रात फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ (१)(३) अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आले होते व या कार्यालयाचे आदेश दिनांक ३१/०३/२०२० व दिनांक १५/०४/२०२० अन्वये सदरील आदेशास दिनांक ०३/०५/२०२० रोजी पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, जालना जिल्ह्यात करोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव नियंत्रणात ठेवणेचे अनुषंगाने जालना जिल्हयात यापुढेही फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ मधील तरतूदी दिनांक ०३/०५/२०२० रोजीच्या मध्यरात्री २४:०० वाजेपर्यंत जालना जिल्ह्यातील संपूर्ण ग्रामीण, नागरी व औद्योगिक क्षेत्रात कोणत्याही ठिकाणी एका वेळेस ५ पेक्षा अधिक व्यक्तींना जमा होण्यास मनाई करण्यात आले आहे.

त्याअर्थी, मी **रविंद्र बिनवडे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना** संदर्भ क्र. १० अन्वये प्राप्त सुधारणाच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे जिल्हयात लॉकडाऊन कालावधीत खालील कामांना सुट राहील.

१) मान्सूनपूर्वीची सर्व त्वरित कामे, इमारतींचे संरक्षण, शटरिंग, वॉटर प्रूफिंग, पूर संरक्षण, इमारतींची प्रस्तावित व स्ट्रक्चरल दुरुस्ती, असुरक्षित इमारती पाडणे वगैरे. तथापि आरोग्य संबंधीचे मानक स्वच्छतेचे नियम, सामाजकि अंतर चे नियम पाळणे बंधनकारक राहील.

उपरोक्त प्रमाणे शिफारस केलेला व्यक्ती अनावश्यक आहे किंवा या आदेशाप्रमाणे शिफारस देण्यास पात्र नाहीत असे दिसून आल्यास उपरोक्त आदेशाची अवज्ञा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने अथवा संस्थेने आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ आणि भारतीय दंड सहिंता १८६० च्या कलम १८८ नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल आणि इतर कलमांसह दिवाणी व फौजदारी कार्यवाही करण्यात येईल.

Raut
(रविंद्र बिनवडे) भा.प्र.से.
जिल्हादंडाधिकारी, जालना
30/4/2020

**प्रतिलिपी (माहीतीस्तव सादर)**
१- मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद.
२- मा.संचालक, आपत्ती व्यवस्थापन विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रत (आवश्यक कार्यवाहीस्तव)**
१-पोलीस अधिक्षक, जालना.
२-मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना.
३-सर्व उपविभागीय दंडाधिकारी जालना जिल्हा.
४-सर्व तालुका दंडाधिकारी जालना जिल्हा.
५-जिल्हा शल्य चिकीत्सक, जालना.
६-जिल्हा आरोग्य अधिकारी, जालना.
७-सर्व संबंधीत विभाग प्रमुख व त्यांचे दुय्यम कार्यालये जि.जालना.
८-जिल्हा माहिती अधिकारी, जालना.